भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# संशोधन व विकास उपकर अधिनियम, १९८६

**(सन १९८६ चा अधिनियम क्रमांक ३२)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Research and Development Cess Act, 1986

**(Act No. 32 of 1986)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ **किंमत : रु. ४.००** ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट सेस अॅक्ट, १९८६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ ३६ ते ३७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २६ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Research and Development Cess Act, 1986 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 36 to 37.

This authoritatve text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# संशोधन व विकास उपकर अधिनियम, १९८६

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. तंत्रज्ञानाच्या आयातीसाठी प्रदान केलेल्या रकमेवर उपकर आकारणे व वसूल करणे.

४. भारताच्या एकत्रीकृत निधीत उपकराचे उत्पन्न जमा करणे.

५. व ६. (वगळण्यात आले.)

७. केंद्र सरकारची सूट देण्याची शक्ती.

८. माहिती मागविण्याची शक्ती.

९. उपकर प्रदान न केल्याबद्दल शास्ती.

१०. नियम करण्याची शक्ती.

एच ४१३२–२ (१०३५–१–२००४)

# संशोधन व विकास उपकर अधिनियम, १९८६
## (१९८६ चा अधिनियम क्रमांक ३२)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[१४ ऑगस्ट, १९८६]

**देशांतर्गत विकसित तंत्रज्ञानाच्या वाणिज्यिक वापरास उत्तेजन देण्याच्या प्रयोजनासाठी तंत्रज्ञानाची आयात करण्याकरिता व आयात केलेल्या तंत्रज्ञानाचा विस्तृत प्रमाणात देशांतर्गत वापरात अवलंब करण्याकरिता दिलेल्या सर्व प्रदानांवर उपकर आकारण्याची व त्याची वसुली करण्याची तरतूद करण्याकरिता आणि तत्संबधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

हा अधिनियम, भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी संसदेकडून अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास "संशोधन व विकास उपकर अधिनियम, १९८६" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) हा अधिनियम, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा ***दिनांकास** अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

[1][(क) "मंडळ" याचा अर्थ, तंत्रज्ञान विकास मंडळ अधिनियम, १९९५ अन्वये घटित केलेले तंत्रज्ञान विकास मंडळ, असा आहे ;

(ख) "उपकर" याचा अर्थ, कलम ३ अन्वये आकारण्यात आलेला उपकर, असा आहे ;]

(घ) कोणत्याही तंत्रज्ञानाच्या संबंधातील "आयात" याचा अर्थ, भारताबाहेरील एखाद्या ठिकाणाहून असे तंत्रज्ञान भारतात आणणे, असा आहे ;

(ङ) "औद्योगिक संस्था" या शब्दप्रयोगास, भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १९६४ (१९६४ चा १८) याच्या कलम २, खंड (ग) मध्ये नेमून देण्यात आलेला अर्थ असेल आणि जिच्या नावे आयात तंत्रज्ञानाचा अंतर्भाव असलेली विदेशी सहयोग संस्था [2][मान्य करण्यात आलेली असेल किंवा भारत सरकारच्या वेळोवेळी अंमलात असणाऱ्या धोरणानुसार आपोआप मान्य होत असेल] अशा व्यक्तीचा समावेश होतो ;

(च) "विहित" याचा अर्थ, ह्या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(छ) "विनिर्दिष्ट अभिकरण" याचा अर्थ,—

(एक) भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) अन्वये घटित भारतीय रिझर्व्ह बँक ; किंवा

(दोन) भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ (१९५५ चा २३) अन्वये घटित भारतीय स्टेट बँक, किंवा

(तीन) केंद्र सरकारद्वारे या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बँक किंवा संस्था, असा आहे.

(ज) "तंत्रज्ञान" याचा अर्थ, कोणताही विदेशी सहयोग असलेल्या एखाद्या औद्योगिक संस्थेला कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असेल असे विशेष किंवा तांत्रिक ज्ञान किंवा विशेष सेवा, असा आहे आणि त्यात संकल्पचित्रे, आरेखने, प्रकाशने आणि तांत्रिक कर्मचारीवर्ग यांचाही समावेश आहे.

तंत्रज्ञानाच्या आयातीसाठी प्रदान केलेल्या रकमेवर उपकर आकारणे व वसूल करणे.

३. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी तंत्रज्ञानाच्या आयातीसाठी केलेल्या सर्व प्रकारच्या प्रदानांवर, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा, पाच टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या दराने उपकर आकारण्यात येईल व वसूल करण्यात येईल.

(२) ज्या औद्योगिक संस्थेकडून तंत्रज्ञान आयात करण्यात येईल त्या संस्थेकडून अशा आयातीसाठी प्रदान केल्यावर किंवा त्यापूर्वी केंद्र सरकारला उपकर देय असेल आणि कोणत्याही विनिर्दिष्ट अभिकरणास, औद्योगिक संस्थेकडून तो प्रदान करण्यात येईल.

---

* १ डिसेंबर, १९८७ पहा. स्थायी आदेश ८७९ (ङ), दिनांक ५ ऑक्टोबर १९८७.

१. १९९५ चा अधिनियम ४५, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला व खंड (ग) वगळण्यात आला (१ सप्टेंबर, १९९६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (१ सप्टेंबर १९९६ रोजी व तेव्हापासून).

भारताच्या एकत्रीकृत निधीत उपकराचे एकत्रीकृत उत्पन्न जमा करणे. ४. कलम ३ खाली आकारणी केलेल्या व वसूल केलेल्या उपकराचे उत्पन्न, प्रथम भारताच्या निधीत जमा करण्यात येईल आणि संसदेने त्या संबंधातील कायद्याद्वारे केलेल्या विनियोजनाद्वारे तशी तरतूद केल्यास, केंद्र सरकार अशा उत्पन्नामधून (वसुलीचा खर्च वजा करून) त्याला योग्य वाटेल अशा रकमा वेळोवेळी [1][मंडळाकडे], [1][मंडळाच्या] प्रयोजनासाठी वापरण्याकरिता देईल.

५. व ६. [2]* * * * * *

केंद्र सरकारची सूट देण्याची शक्ती. ७. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लोकहितार्थ तसे करणे आवश्यक आहे किंवा इष्ट आहे असे केंद्र सरकारचे मत असल्यास, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा काही अटी असल्यास त्यांच्या अधीनतेने, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अशा तंत्रज्ञानाच्या आयातीसाठी, ह्या अधिनियमाखाली देय होणाऱ्या उपकराच्या प्रदानामधून कोणत्याही औद्योगिक संस्थेस सूट देईल.

माहिती मागविण्याची शक्ती. ८. [3][मंडळ] एखाद्या औद्योगिक संस्थेला ह्या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, विहित करण्यात येईल अशी आकडेवारी व इतर माहिती विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व कालावधीत पाठविण्यास फर्मावू शकेल.

उपकर प्रदान न केल्याबद्दल शास्ती. ९. (१) जर एखाद्या औद्योगिक संस्थेकडून तंत्रज्ञानाच्या आयातीचे प्रदान करतेवेळी किंवा त्यापूर्वी देय उपकर चुकता करण्यात आला नाही तर, तो उपकर थकबाकी समजण्यात येईल आणि [3][मंडळाकडून] ती थकबाकी विहित करण्यात येईल अशा पद्धतीनुसार वसूल करण्यात येईल.

(२) [3][मंडळ] त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर पोटकलम (१) खालील थकबाकी असलेल्या औद्योगिक संस्थेवर त्या थकबाकीच्या रकमेच्या १० पटीपेक्षा अधिक होणार नाही इतकी शास्ती बसवील :

परंतु, अशा औद्योगिक संस्थेवर अशी शास्ती बसविण्यापूर्वी आपले म्हणणे मांडण्यासाठी योग्य संधी त्या संस्थेला देण्यात येईल आणि तिचे म्हणणे ऐकल्यानंतर अशा कसुरीबाबत कोणतेही योग्य व पुरेसे कारण असल्याबाबत [3][मंडळाचे] समाधान झाल्यास, ह्या पोटकलमाखाली कोणतीही शास्ती बसवण्यात येणार नाही.

नियम करण्याची शक्ती. १०. (१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या उपबंधांच्या अंमलबजावणीसाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करील.

(२) विशेषतः व पूर्वगामी शक्तीला बाध न येता अशा नियमात खालील बाबींकरिता तरतूद करता येईल :—

(क) कलम ८ खालील माहिती ज्या नमुन्यात व ज्या कालावधीत द्यावयाची तो नमुना व तो कालावधी ;

(ख) कलम ९, पोटकलम (१) खाली उपकराच्या थकित रकमेची वसुली ज्या रीतीने करावयाची ती रीत ;

(ग) विहित करणे आवश्यक असलेली किंवा विहित करण्यात आलेली अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

---

१. १९९५ चा अधिनियम ४५, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (१ सप्टेंबर, १९९६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे कलम ५ व ६ वगळण्यात आले (१ सप्टेंबर, १९९६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (१ सप्टेंबर, १९९६ रोजी व तेव्हापासून.)

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई